## नियमित दिवाणी दावा क्रं.४९७/२०१९ मधील अर्ज (नि.४३) वरील आदेश

सदर कामी प्रतिवादी यांनी दि.१७/०९/२०२२ रोजी वकिलपत्र दाखल केलेले आहे. सदर कामातील नकला लिफाफा बंद असल्यामुळे त्यांना नकला न मिळाल्यामुळे ते कैफियत दाखल करु शकले नाहीत. सबब, आज प्रतिवादी कैफियत दाखल करत असून, सदर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

२. प्रतिवादी क्र.१ ते ९ हे दि.१७/०९/२०२२ रोजी हजर झाले असून, दावा नि.१ व नि.३ च्या प्रति प्रतिवादी यांनी स्विकाराव्यात असा दि.१२/११/२०२२ रोजी आदेश झाला होता. सदर प्रति स्विकारण्यास प्रतिवादी यांनी जाणुन–बुजुन उशीर केला असून, कैफियत दाखल करण्यास विलंब केला आहे. त्यांनी सदर अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

३. दोन्ही बाजुंच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी दि.१७/०९/२०२२ रोजी दाव्यामध्ये हजर झाले, परंतु, दाव्याच्या नक्कला लिफाफा बंद असल्यामुळे त्यांना नकला मिळण्यास विलंब झाल्याचे दिसुन येते. दाव्याचे स्वरुप व अर्जातील नमुद कारण लक्षात घेता, वादाचा गुणदोषाकरीता सदर कैफियत अभिलेखावर असणे गरजेचे आहे. तसेच सदर कैफियत अभिलेखावर आल्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही, तसेच वादींना बचाव मांडणेस व कथने आव्हानीत करणेस संधी उपलब्ध आहे. अशा स्थितीत सदरची कैफियत अभिलेखावर असणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, खालीलप्रमाणे आदेश करीत आहे –

### आदेश

अर्ज (नि. ४३) मंजुर करणेत येतो.

सही/-

फलटण. (श्रीमती एस.आर.बडवे.)

दिनांकः–१६/०८/२०२३. ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, फलटण.